■ प्रतिसाद ■

# मराठा-दलित-ओबीसी संघर्षाचे मूळ : सत्यशोधक चळवळीचे अपहरण!



**श्रावण देवरे**

राजू जाधव यांच्या 'परिवर्तनाचा वाटसरू' १६ ते ३१ डिसेंबर २०१६ च्या लेखाचे शीर्षकच सांगते की हा लेख केवळ टिंगलटवाळी करण्यासाठी लिहिला आहे. 'श्रावणबाळाची विरोधभक्ती' या जाधवांच्या लेखाच्या शीर्षकात अथवा शीर्षकाशी संबंधित एखादा वैचारिक मुद्दा त्यांच्या लेखात असेल तर तो कोणीतरी आम्हाला समजावून सांगावा! सर्वात कळस म्हणजे माझ्या लेखामुळे केवळ ढमालेंचीच बदनामी झाली असे नाही, तर संपूर्ण चळवळच बदनाम झाली व चळवळच धोक्यात आल्याचे जाधव सांगतात. (पान-५५). पुढे जाधव ढमालेंशी मतभेद असल्याचे दाखवीत ढमालेंशी लुटुपुटुची लढाई लढतात. ॲट्रॉसिटी ॲक्टसंदर्भात ढमालेंची जी मराठाधार्जिणी भूमिका आहे ती चुकीची आहे असे जाधव म्हणतात. (पान-५६).

आम्ही स्वजातीय नेत्यांचा 'फिडेल कॅस्ट्रो' म्हणून गौरव करतो, असा एक आरोप जाधवांचा आहे. (पान-५८, फिडेल कॅस्ट्रो, क्युबाचे कालकथित अध्यक्ष, ज्यांनी आपल्या देशात साम्यवादी क्रांती घडवून आणली. आधीच्या त्यांच्या राजकीय काळात ते भांडवली लोकशाहीवादी होते. परंतु परिस्थितीच्या रेट्याने ते मार्क्सवादी झालेत व त्यांनी साम्यवादी क्रांती करून आपल्या देशाला इतके सक्षम केले की बलाढ्य अमेरिकेलाही नमविले. जातीअंताच्या युद्धात काही विरोधी सेनापती अचानक 'फिडेल कॅस्ट्रो' झालेले आपण पाहू शकतो! पण ते दिसण्यासाठी जाती-लढ्याला 'जाती-युद्धाच्या स्वरूपात' पाहण्याची तत्त्वज्ञानात्मक दृष्टी हवी!

काँग्रेसचे नेते व्ही. पी. सिंग हे विचारांनी गांधीवादी-भांडवली व संस्कारांनी सरंजामी राजेशाही! परंतु भारतातील जातीअंतक चळवळीच्या रेट्याने त्यांना मंडल आयोग लागू करण्यास भाग पाडले व ते बनले जातिअंतक चळवळीचे मसिहा! एक सरंजामी घराण्यातील

ईमेल : s.deore2012@gmail.com

राजा जो लोकशाहीवादी होणेही मुष्कील! पण जर तो परिस्थितीच्या रेट्याने जातीअंतक लोकशाहीवादी होऊन क्रांतीचे साधन बनत असेल तर त्याला म्हणतात 'फिडेल कॅस्ट्रो'! असे फिडेल कॅस्ट्रो बनण्याची पात्रता भारतातील ओबीसी नेत्यांमध्ये कधीच येऊ शकत नाही, असे समजणे म्हणजे आपल्या मनातील जातीयवादाला उच्चतर स्तरावर नेण्यासारखे आहे. उच्चतर स्तरावर गेलेला हा जातीयवाद फार सोयीस्करवादी बनतो! तो असे समजूनच चालतो की, खालच्या जातीचे लोक कधीच बरोबर (Right) असू शकत नाही. हा उच्चतर जातीयवाद असे समजूनच चालतो की, छगन भुजबळ यांना जी अटक झाली आहे, ती केवळ भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली! भ्रष्टाचार हा एकमेव निकष मानला तर एखाद्या पक्षाच्या दुय्यम नेत्याला हा निकष जेलमध्ये नेतो व त्याच पक्षाच्या संस्थापकाला 'पद्मविभूषण' पुरस्काराने गौरवितो! हे कसे? विशेष म्हणजे हा पुरस्कार ज्या सरकारने दिला त्यांनीच जाहीर सभांमधून अनेक वेळा सांगितले आहे की 'आमचे सरकार आल्यावर आम्ही ताबडतोब या (राष्ट्रवादी?) लोकांना प्रमुखासह जेलमध्ये टाकू!' निकष भ्रष्टाचाराचा नाही तर, जातीचा आहे! आणि आमचा विरोध नेमका यालाच आहे! भ्रष्टाचाराच्या निकषाला जातीचा निकष जोडणे निषेधार्हच आहे! पण तो उघडपणे जोडला जातो; त्यामुळे भ्रष्टाचारी जर खालच्या जातीचा असेल तर तो जाईल जेलमध्ये व वरच्या जातीचा असेल तर तो पावेल 'पद्मविभूषण'! दुसरा एक ओबीसी नेता जो पार्लमेंटमध्ये ओबीसी जातगणनेसाठी घणाघाती भाषण करतो आणि मृत्यदंडाच्या शिक्षेस पात्र होतो!

मी माझ्या लेखात फुलेवाद, आंबेडकरवाद, मार्क्सवाद यांना बुरखे म्हणतो, असे जाधव लिहितात (पान५९). जाधवांनी माझा लेख वाचण्याचीही तसदी घेतली नाही, असे आता म्हणावे लागेल. मार्क्सवाद, फुलेवाद, आंबेडकरवाद ही तत्त्वज्ञाने क्रांतिकारकच आहेत. मात्र प्रस्थापित पक्षांच्या मालकांनी बदलत्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी आपल्याच पक्षाच्या काही नेत्यांना फुले-आंबेडकरवादाचे बुरखे घालायला सांगितले आहे. हे बुरखेधारक व त्यांचे उच्चजातीय पक्षमालक जात्यंतक लोकशाही क्रांतीतले सर्वात मोठे अडथळे बनले आहेत. फुले-आंबेडकरवादाचे बुरखे पांघरून अनेक लोक आज प्रस्थापितांचेच राजकारण करीत आहेत. त्यांचे हे बुरखे फाडणे व त्यांना उघडे पाडणे, हे आपले कर्तव्य नाही काय? त्यांचे हे बुरखे फाडले तरच ते खरे क्रांतिकारक बनण्याचा प्रयत्न करू शकतात, अन्यथा प्रतिक्रांतिकारक म्हणून उघडे पाडले जाऊ शकतात. मात्र आपल्याकडे जातीय शॉर्टकट आहेत. एखाद्याचा बुरखा फाडत बसण्यापेक्षा त्याला उचलून सरळ जेलमध्येच टाकले की प्रश्न संपतो, असे यांना वाटते.

'ओबीसी जाती भुजबळांमुळे शिवसेनेत व मुंडेंमुळे भाजपात गेलेत आणि त्यामुळेच आरएसएससारख्या ब्राह्मणी शक्ती मंडल आयोग अंमलबजावणीच्या चळवळीस विरोध करण्यासाठी ओबीसीचा वापर करू शकल्या, हे विसरून चालणार नाही' (पान-६०), असे जे जाधव म्हणतात ते सत्यच आहे, पण ते या सत्याच्या मुळापर्यंत जात नाहीत कारण हे मुळातले सत्य त्यांच्या लेखालाच सुरुंग लावेल! राजकारणातील ७५ ते ८० टक्के जागा मराठ्यांनी अडविल्या आहेत, असे बाबा आढाव आपल्याला सांगतात. पण या जागा त्यांनी अडवण्याच्या आधी कशा बळकावल्यात, हे पाहणेही धक्कादायक आहे! राजकारणातील या सर्व जागा त्यांनी स्वतःच्या गुणवत्तेतून मिळविल्या असे नाही, तर आधीच्या गुणवान लोकांना दादागिरीने हटवून मिळविल्या आहेत! धुळ्याचेच उदाहरण द्यायचे तर शिरपूर व कुसुंबा मतदारसंघाचे देता येईल! शिरपूर मतदारसंघातून काँग्रेसचे कर्मवीर आण्णासाहेब व्यंकटराव रणधीर व उद्यानपंडित बापूसाहेब ग. द. माळी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आमदार म्हणून निवडून येत होते. हे दोन्ही स्वातंत्र्यसैनिक! या दोन्ही ओबीसीं जातीतील नेत्यांचे पाय छाटण्यासाठी विरोधी असलेल्या समाजवादी पक्षातील शिवाजी पाटलांना आयात करण्यात आले व त्यांना काँग्रेसचे तिकीट देऊन आमदार बनविले गेले. प्राचार्य, साहित्यिक, लेखक व विचारवंत असलेले सदाशिवराव माळी हे कुसुंबा मतदारसंघातून केवळ आपल्या स्वतःच्या गुणवत्तेवर निवडून येत होते. त्यांना १९७२ साली ज्या अपमानास्पद पद्धतीने हटविण्यात आले, त्याला इतिहासात अजून तोड नाही.[१] त्यांच्या जागेवर तेव्हापासून कोणतीही गुणवत्ता नसलेले पाटील घराणे आमदार म्हणून निवडून येत आहे. स्वतःच्या कर्तृत्वाने व सामूहिक भावनेने साखरउद्योग उभे करणारे माळीनगरचे

माळी लोक, त्यांच्या माळशिरस मतदारसंघातून कधीच आमदार म्हणून निवडून जाऊ शकत नाहीत. मात्र सरकारी पैशाने व सरकारी सवलतीतून निर्माण झालेल्या साखरसम्राटांची घराणी आपापल्या मतदारसंघात कायमची संस्थानिक होऊन बसलेली आहेत. या तथाकथित मराठा-सम्राटांनी माळी-ओबीसी लोकांच्या जमिनी कशा बळकावल्यात व त्यासाठी कोणते हिंसक मार्ग अवलंबलेत याचा एक किस्सा कॉ. शरद् पाटील यांनी ‘परिवर्तनाच्या वाटसरू’मधील लेखात दिलेला आहे, तो मुळातूनच वाचला तर लक्षात येते की, कॉ. शरद् पाटलांनी जात्यंतक लोकशाही क्रांतीसाठी मराठ्यांची ही ‘जात-गुर्मी’ गिलोटिनखाली ठेचण्याची आवश्यकता प्रतिपादली आहे.[२]

डॉ. बाबा आढावांनी व कॉ. शरद् पाटलांनी मराठा-प्रवृत्तीचा बीमोड करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे, पण हे काम कोण करणार? अर्थातच हे काम ओबीसी-दलितांनाच करावे लागेल, असे जातीयुद्धाचे समाजशास्त्र सांगते! पण बाबा आढाव म्हणतात त्याप्रमाणे दलितांनी मराठ्यांसोबत तह केल्याने[३] हे काम केवळ ओबीसींच्या खांद्यावर आले आहे. लोकशाही समाजवादी राज्यातच ही मराठा-प्रवृत्ती कायमची ठेचली जाऊ शकते, असा विश्वास डॉ. बाबा आढावांना वाटत असला तरी तसा पर्याय तत्कालीन राजकीय व्यवस्थेत उपलब्ध नव्हता. लोकशाही व समाजवादाची स्वप्ने दाखविणारे कम्युनिस्ट व समाजवादी पक्ष आपापल्या ब्राह्मण जातीचेच राजकारण करीत होते. केरळ व पश्चिम बंगालमध्ये ब्राह्मणच मुख्यमंत्री हवा म्हणून यांचा अट्टहास! समाजवादीही तीच वाट चालत होते. म्हणजे गुणात्मकदृष्ट्या मराठा-प्रवृत्ती व ब्राह्मण-प्रवृत्ती यात कोणताही फरक नव्हता व आजही नाही. त्यामुळे ओबीसींना भाजप-शिवसेनेशिवाय दुसरा कोणताही पर्याय शिल्लक ठेवलेला नव्हता. क्रांतिकारक पर्याय उपलब्ध नसतील तर विद्रोही समाजघटक मिळेल त्या मार्गाने असंतोष व्यक्त करीत असतो.[४] या ओबीसी समाजघटकांच्या राजकीय विद्रोहाचे तत्कालीन नेतृत्व भुजबळ-मुंडे यांनी केले एवढेच! भुजबळ-मुंडेंनी हे ऐतिहासिक कार्य केले नसते तर ओबीसी जाती ‘राजकीय-लोकशाही प्रक्रिये’त कधीच आल्या नसत्या.[५] त्यामुळे ओबीसींना भाजप-शिवसेनेच्या नादी लावणे पाप असेल तर, हे पाप मराठा-प्रवृत्तीच्या माथी जाते, हे डॉ. आढाव व कॉ. पाटील यांच्या विश्लेषणातून सिद्ध होते. जाधवांनीही ते समजून घेतले तर बरे होईल!

‘प्रा. देवरे हे मराठा व ओबीसी समाजघटकांमध्ये विनाकारण भांडण लावत आहेत’, असा जाधवांचा आरोप आहे (पान-६०). मराठा व मराठेतर तत्सम जाती यांच्यातील भांडणाला एक मोठा अर्वाचीन इतिहास आहे, त्याचा जाधवांनी अभ्यास करणे गरजेचे आहे! मराठ्यांनी सत्यशोधक चळवळ आपल्या जात-स्वार्थासाठी कशी हायजॅक केली व तत्सम मराठेतर (ओबीसी) जातींशी कशी गद्दारी केली, याचा सविस्तर इतिहास डॉ. य. दि. फडके यांनी आपल्या अनेक खंडी ‘विसाव्या शतकातील महाराष्ट्र’ या महाग्रंथात विषद केला आहे. हे सर्व ग्रंथ जाधवांनी प्रामाणिकपणे वाचावेत! त्याशिवाय त्यांच्या डोक्यातील उच्चतर जातीय-जाणीव नष्ट होणार नाही.

जोपर्यंत गाय गाभण असते तोपर्यंत तिची खूप काळजी घ्यावी लागते, वेळच्या वेळी चारा-पाणी व सकस अन्न खाऊ घालावे लागते. सत्यशोधक चळवळ जोपर्यंत या अवस्थेत होती तोपर्यंत तत्कालीन दलित-ओबीसींनी या गायीची खूप सेवा केली. मात्र गाय दुधाळ बनताच


परिवर्तनाचा
वाटसरू
## वर्गणीचे नवे दर

आपली वर्गणी वाटसरू कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवताना नाव, पत्ता, फोन नंबर व ई-मेल इत्यादी तपशील कळवावेत. वर्गणीची रक्कम रोख/मनिऑर्डर/चेक/डीडी/ऑनलाईन यांपैकी कोणत्याही मार्गाने पाठवू शकता. चेक अथवा ड्राफ्ट **‘परिवर्तनाचा वाटसरू’** या नावाने असावा. वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी आमच्या www.pvatsaru.com या संकेतस्थळाला भेट द्या.

- १ वर्षासाठी वर्गणी : ₹ ४५०
- ३ वर्षांसाठी वर्गणी : ₹ १२००
- १० वर्षांसाठी वर्गणी : ₹ ३५००
- सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक वर्गणी : ₹ ३५०
- सॉफ्ट + छापील अंकाची वार्षिक वर्गणी : ₹ ६५०

तिच्यावर 'ब्राह्मणेतर' पक्षाची झूल टाकून तिचे अपहरण करण्याचे काम मराठ्यांनी केले.

मॉंटेग्यु व चेम्सफर्ड सुधारणांच्या पार्श्वभूमीवर मराठ्यांनी कायदेमंडळात निवडून येण्यासाठी राखीव जागांची मागणी केली. कारण ब्राह्मण उमेदवाराचा पराभव करून मराठा जिंकून येण्याची सुतराम शक्यता त्या काळात नव्हती. टिळकांनी कुणबी-मराठ्यांना कायदे मंडळात यायला बंदी घातली. अशा परिस्थितीत राखीव जागा मागण्याशिवाय मराठ्यांजवळ पर्यायच नव्हता. पण इंग्रज हुशार! त्यांना किमान सामाजिक चाड तरी होती. त्यांनी 'मराठा व तत्सम जाती' या नावाची एक नवी कॅटेगिरी तयार केली.

''... या नव्या कोटीत (category) मराठा, कुणबी, माळी, कोळी, भंडारी, शिंपी, लोहार, कुंभार, धनगर, भोई, बारी, लोहारी, भावीण, देलोई अथवा शिंदे वगैरे जातीतील लोकांचा समावेश होईल, असे या जातींचा स्पष्ट नामनिर्देश करून इंग्रज राज्यकर्त्यांनी जाहीर केले...''[६]

ही कॅटेगिरी म्हणजे तत्कालीन 'ओबीसी' (ECBC) प्रवर्ग होता, हे कोणीही सुज्ञ माणूस सांगेल. त्या काळी मराठ्यांनी प्रमाणिकपणे या ओबीसी प्रवर्गाचे नेतृत्व केले असते व त्यातून मिळालेल्या सत्ता, संपत्तीचे, साधने व सवलतींचे समान वाटप या जातींमध्ये केले असते तर, आज मराठ्यांना राखीव जागांसाठी ओबीसींकडे हात पसरण्याची व त्यासाठी लाखोंचे मोर्चे काढण्याची गरजच पडली नसती. पण सर्वांना बरोबर घेऊन चालतील ते मराठे कसले? १९२० च्या सोलापूरच्या ब्राह्मणेतर परिषदेत सत्यशोधक कोठारींनी निवडून आणलेला अध्यक्ष फेटाळून मराठ्यांनी आयत्या वेळी डॉ. खेडकरास खुर्चीवर बसविले, तेव्हा मुकुंदराव पाटील साक्ष देताना म्हणतात-

''... सत्यशोधक समाजाची तत्वे मान्य असलेल्या 'विजयी मराठ्या'ने मराठ्यांची टिमकी पिटीत राहणे, **मराठ्यांपुरत्याच स्वतंत्र जागा मागणे हे जात्याभिमानाच्या दृष्टीने सर्वस्वी योग्य असेल;** पण सत्यशोधक समाजाच्या दृष्टीने सर्स्वस्वी अयोग्य होय!'' (जाड ठसा माझा.)

तत्कालीन ओबीसी कॅटेगिरीला सोबत न घेता मराठ्यांपुरतेच बघण्याची ही मराठा-प्रवृत्ती जातीयवादी होती व तिच्यामुळेच मराठा विरुद्ध दलित-ओबीसी भांडणाची सुरुवात झाली. नंतर हे मराठे सत्तेवर कसे आले व शेटजी-भटजींचे दास कसे बनले याचे सविस्तर वर्णन नाव-पुराव्यांसह डॉ. बाबा आढावांनी आपल्या पुस्तिकेत दिलेले आहेच! ब्राह्मणेतर पक्षातील सत्यशोधक विचारांचे जे नेते होते, ते मवाळ ब्राह्मणांशी दोस्ती करण्याची मागणी करीत होते. ज्या ब्राह्मणांना सत्यशोधक विचार मान्य आहेत, त्यांना सोबत घेतले पाहिजे, असे या सत्यशोधकांचे म्हणणे होते. मात्र ज्या मराठ्यांना आपले जातवर्चस्व स्थापन करायचे होते, त्यांना पुरोगामी ब्राह्मण नकोच होते. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ साली महाडच्या चौदार तळ्यावर सत्याग्रह करण्यासाठी ब्राह्मणेतर पुढारी जेधेंना निमंत्रित केले, तेव्हा जेधेंनी अट टाकली की, ब्राह्मण नसेल तरच आम्ही येऊ. बाबासाहेबांनी स्पष्ट सांगितले की, 'मी ब्राह्मण्याचा विरोधक आहे, ब्राह्मण व्यक्तींचा नाही.' फुले-आंबेडकरांनी एकूणच जात नष्ट करणारी चळवळ उभी केली. या दोन्ही महापुरुषांच्या चळवळींचा लाभ घेत सत्ता मिळविणाऱ्या मराठ्यांनी आज जातीच्या नावाने लाखोने रस्त्यावर उतरत कसा जातीय-दहशतवाद माजविला आहे, हे आपण पाहात आहोतच! तेव्हा मराठा-मराठेतर भांडण लावण्याचे काम प्रा. देवरे अथवा देवरेंच्या पूर्वसुरींनी नाही तर, ढमाले-जाधवांच्या तत्कालीन पूर्वजांनी केले आहे आणि तीच भांडणाची परंपरा जतन करण्यासाठी ढमाले आपली लेखणी झिजवीत आहेत.

मंडल आयोगाचा लढा मुख्यतः ब्राह्मण्यवादाविरोधात व त्याच्या केंद्र सरकारविरोधात होता. त्यामुळे ओबीसींचा मराठ्यांशी वाद होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. ओबीसी हा मराठ्यांच्या हिश्श्याचे काही मागत नव्हता, त्यांच्या साखर कारखान्यात अथवा को-ऑप. बँकात नोकऱ्या मागत नव्हता, त्यांची राजकीय पदेही मागत नव्हता. त्यामुळे मराठा-ओबीसी भांडण होणे शक्यच नव्हते. परंतु मंडल आयोगाचा अहवाल संसदेच्या पटलावर येताच 'मराठा महासंघ' स्थापन करण्यात आला. या मराठा महासंघाने महाराष्ट्रभर मंडल आयोगाविरोधात व ओबीसीविरोधात सभा घेतल्या व मंडल आयोग लागू झाल्यास महाराष्ट्र पेटविण्याची भाषाही केली. काहीही कारण नसताना भांडण उकरून काढण्याची ही मराठा-प्रवृत्ती ढमाले-जाधवांनी अभ्यासणे गरजेचे आहे. अभ्यास नसल्यामुळे भांडण लावण्याचा आरोप कोणावरही केला

जातो व फसतो. अशी फसगत टाळण्यासाठी मी हा अभ्यासाचा सल्ला देत आहे.

एकीकडे ब्राह्मणवादविरोध, दुसरीकडून मराठा-जाट-पटेलसारख्या तथाकथित क्षत्रिय राज्यकर्त्या जातींचा विरोध, तिसरे ते मुंडे-भुजबळांसारखे भाजप-सेनेचे नेते जे ओबीसींना मंडल आयोगाऐवजी राममंदिराचा रस्ता दाखवित होते, चौथे ते कम्युनिस्ट जे मार्क्सवादाचा बुरखा घालून 'वर्ग-वर्ग' नावाची पोथी वाचत मंडल आयोगाला विरोध करीत होते, पाचवे ते शरद जोशी जे ओबीसी जातीच्या शेतकऱ्यांना 'राखीव जागा म्हणजे उष्ट्या पत्रावळीसाठीचे भांडण' असल्याचे सांगून मंडल आयोगाला विरोध करीत होते, सहावे ते कांशीराम ज्यांनी मंडल आयोग लागू होत असतांना जाट देवीलालशी हातमिळवणी करून मंडलवादी सरकार पाडण्यास हातभार लावला. मंडल आयोग आंदोलनाची सर्व बाजूने कोंडी करण्यात व या आंदोलनाची सर्व प्रकारची 'रसद' तोडण्यात वरील सर्व विरोधक यशस्वी झाले होते. परंतु तरीही अशा अनेक विरोधकांच्या विरोधाला भीक न घालता असंख्य ओबीसी कार्यकर्त्यांनी मंडल आयोगाचा लढा यशस्वी केला.

मंडल आयोग लागू होऊन ओबीसींना काही फायदे मिळायला लागल्यावर वरच्या जातींची पोटदुखी सुरू झाली. आता इतिहासाची चक्रे उलटी फिरविता येत नसल्याने मंडलविरोध शक्य नव्हता. ओबीसींनी जे कष्टाने मंडलच्या माध्यमातून कमविले होते, ते त्यांच्या ताटातून कसे हिसकावयाचे यासाठी षडयंत्र रचण्याचे काम सुरू झाले. यातून ओबीसी विरुद्ध मराठा-जाट-पटेल असे राष्ट्रव्यापी गृहयुद्ध पेटविण्याचा कार्यक्रम आरएसएसने तयार केला. क्षत्रिय वर्ण-जातींचा गैरवापर करीत त्यांना शूद्रातिशूद्रांच्या विरोधात लढविण्याचा धंदा तसा फार जुना म्हणजे रामायण-महाभारतच्या काळापेक्षाही जुना आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हा धंदा आरक्षणाविरोधातून पुन्हा सुरू करण्यात आला. आणि आज आरक्षण मागण्यातून हा धंदा गतिमान झाला आहे. कोणी कितीही युद्धपिपासू असेल, जोपर्यंत समोरची व्यक्ती शांत आहे तोपर्यंत युद्ध सुरू होऊ शकत नाही. १९८१-८२ साली मराठा महासंघाने काहीही कारण नसतांना मंडल आयोगाला आक्रमक विरोध करून ओबीसींना जातयुद्धासाठी आव्हान दिले, परंतु ओबीसी शांतपणे आपले मंडल-आंदोलन लोकशाही पद्धतीने करीत राहीला. त्यामुळे त्याकाळी मराठा-ओबीसी भांडण टळले. आता या शांत-प्रवृत्तीच्या ओबीसींना युद्धासाठी कसे तयार करायचे असा प्रश्न उभा राहिला. अशा वेळी एकच मार्ग होता, तो म्हणजे घुसखोरीचा! शांतीदूत असलेला भारत स्वतःहून कधीच युद्ध करीत नाही, मात्र पाकिस्तानने (कारगिलसारखी) घुसखोरी करताच भारताला युद्ध केल्याशिवाय पर्यायच राहत नाही. युद्धखोर प्रवृत्तीचे लोक शेवटचा पर्याय म्हणून घुसखोरीचा मार्ग अवलंबतात. आता आम्हालाही ओबीसी आरक्षण हवे म्हणून क्षत्रीय जातींकडून घुसखोरीची मागणी सुरू झाली. या घुसखोरीच्या मागणीमुळे ओबीसी लाखांचे मोर्चे काढतील, वातावरण पेटेल व अपेक्षेप्रमाणे मैदानातले जातयुद्ध सुरू होईल, असे प्रस्थापितांना वाटले. मात्र जोपर्यंत आमच्यासारखे कार्यकर्ते ओबीसींचे नेतृत्व करीत आहेत, तोपर्यंत ओबीसी शांतच राहणार! आम्ही या संभाव्य युद्धावर तोडगा काढला! आणि हा तोडगा आहे 'नचिअप्पन कमिटीचा!' २००५ पासून आम्ही हा तोडगा पाठपुरावा करून लोकांसमोर व मराठ्यांसमोर मांडत आहोत.

२००९ सालची लोकसभा निवडणूक मराठा आरक्षणाने पेटली असताना आम्ही नचिअप्पन कमिटीवरची पुस्तिका लिहिली व निवडणूक जाहीरनामा म्हणून प्रकाशित केली. नचिअप्पन कमिटीचा तोडगा म्हणजे कोणत्याही जातीयुद्धाचे मूळ नष्ट करण्याचा एक प्रभावी मार्ग होय! मी व प्रदीप ढोबळेंनी 'ओबीसी सेवा संघा'तर्फे मराठा समाजाच्या तरुणांना अनेक वेळा जाहीर आवाहन केले की, मराठा आरक्षणसाठी मेळावे, मोर्चे वगैरे आंदोलन वारंवार करण्याऐवजी फक्त मराठा खासदार व आमदारांच्या घरासमोर एकदिवसाचे आंदोलन करा व त्यांना विधानसभेत-लोकसभेत नचिअप्पनचा ठराव मांडण्यास सांगा! महाराष्ट्रात मराठा समाजाचे आमदार किमान १४५ आहेत, म्हणजे निम्मेच्यावर! विधानसभेत एका फटक्यात नचिअप्पनचा ठराव मंजूर होईल, बाकीचे दलित-ओबीसी-आदिवासी आमदार पाठिंबा देतीलच! विधानसभेत मंजूर झालेला हा ठराव केंद्रसरकारकडे पाठवावा. केंद्र सरकार लोकसभेत ठराव मांडेल. जाट-

**(पान ६६ वर)**

मुळात सरंजामी समाजात मानवी संबंधांचे वस्तुकरण, फेटिशिझम होत नाही.

'कमॉडिटी फेटिशिझम'' (क्रयवस्तूभ्रम), मानवी संबंधांचे वस्तुकरण हे या मार्क्सचे विश्लेषण वाचल्यावर भांडवली जगात मानवी संबंधांचे झालेले उफराटेपण जसे लक्षात येते तसेच क्रयवस्तूभ्रमामुळे भांडवली पिळवणूक कशी झाकली जाते जसे स्पष्ट होते तसा उलगडा फेटिशिझम, वस्तुकरण या संकल्पना बगाडे यांनी भारतीय सरंजामशाहीच्या संबंधात वापरल्याने या व्यवस्थेच्या कोणत्याच बाबतीत होत नाही. आधीच जड झालेली त्यांची मांडणी आणखी जड होते एवढेच. सैद्धांतिक संकल्पना या वस्तुस्थितीदर्शक हव्या. एक प्रकारची वस्तुस्थिती उलगडण्यासाठी सुयोग्य असलेली संकल्पना दुसऱ्या, वेगळ्या वस्तुस्थितीसाठी वापरणे याला मार्क्स forced abstraction म्हणतो. तसा काहीसा प्रकार बगाडेंनी केला आहे.

भारतातील सरंजामशाहीतील धर्मसत्ता, त्यातील ब्राह्मणशाही हे परात्मीकरणाचे एक ठोस उदाहरण आहे, हे उलगडून दाखवणे आवश्यक आहे. बगाडे यांची मांडणी या दिशेने गेली असती तर बरे झाले असते. ●

---

**(श्रावण देवरे / पान ६२ वरून)**

पटेल-मराठा व तत्सम क्षत्रिय जातींचे खासदार १५० च्यावर आहेत. लोकसभेत सहज ठराव मंजूर होईल. मराठा मोर्च्यांची बाजू घेऊन लेखणी झिजविणारे ढमाले-जाधव उपरोक्त कार्यक्रम हाती घेतील काय? न्यायमूर्ती पी. बी. सावंत, न्यायमूर्ती कोळसे-पाटील, डॉ. बाबा आढाव, कॉ. प्रवीण गायकवाड, कॉ. किशोर ढमाले असे दहा दिग्गज मराठा नेते आझाद मैदानावर उपोषणाला बसलेत तर मराठा मोर्च्याच्या संयोजकांना पुढील मोर्च्याच्या निवेदनात पहिल्या क्रमांकाची मागणी 'नचिअप्पन'ची टाकावी लागेल व मराठा मोर्च्याचे एकूणच प्रतिगामी स्वरूप बदलले जाईल. मग कॉ. किशोर ढमालेंच्या स्वप्नातील बौद्धक्रांतीचे, पत्रीसरकारचे व संयुक्त महाराष्ट्रापासून थेट साम्यवादी क्रांतीपर्यंतचे दरवाजे उघडण्यास सुरुवात होईल! ●

**संदर्भ**

१. माजी आमदार व माजी प्राचार्य सदाशिवराव माळी आज हयात असून त्यांच्यासंदर्भातला हा किस्सा पडताळून पाहिला जाऊ शकतो.
२. कॉ. शरद् पाटील यांचा हा लेख 'परिवर्तनाचा वाटसरू' या पाक्षिकाच्या १६ ते ३१ जुलै २००४ च्या अंकात प्रकाशित झाला आहे.
३. डॉ. बाबा आढाव, परिवर्तनाचा वाटसरू, १६ ते ३१ डिसेंबर २०१६, पान-३६
४. उच्चजातीयांच्या राजकीय व्यवस्थेत कुठेही जागा मिळत नसलेले समाजघटक असंतुष्ट होऊन जेव्हा पर्याय शोधतात तेव्हा त्यांच्यासमोर भाजप-सेनेचे सापळे लावले जातात, परिणमी हे समाजघटक पुन्हा उच्चजातीयांच्याच कचाट्यात सापडतात व एनकाऊंटर केले जातात.
५. मराठा-प्रवृत्तीचा बिमोड करण्याची जी ऐतिहासिक जबाबदारी काळाच्या रेट्यामुळे अप्रत्यक्षपणे भुजबळ आणि मुंडे यांच्या खांद्यावर आली होती, तिच्या शेवटच्या टप्प्यावर ते आले असतांना त्यांचा एनकाऊंटर होणे हा जातीयुद्धाचा एक अपरिहार्य भाग झाला.
६. डॉ. य. दि. फडके, उक्त, पान-२६१.
७. डॉ. य. दि. फडके, उक्त, पान-२६९.

---

## प्रतिसाद : कज्ञा मोठा घोरंधर

१ जानेवारीचा परिवर्तनाचा वाटसरूचा अंक हातात पडला आणि प्रज्ञा पवार यांचे भाषण एका दमात वाचून काढले. अतिशय मोठा आवाका आणि नेमकी चिकित्सा ही या भाषणाची खास वैशिष्ट्ये वाटली. लेखिकेने स्त्रीमुक्ती चळवळ आणि दलित लेखिका व दलित स्त्री मुक्तिवाद यांच्यातील द्वंदही चांगले समजावून घेतलेले दिसते. स्त्रीचळवळीने कायद्याची चिकित्सा करण्याची गरज ओळखली आहे आणि केवळ बाबासाहेबांनी घटना लिहिली म्हणून सर्व कायदे प्रमाण मानण्याची प्रथा दलित चळवळीने आणि विशेषत: दलित स्त्रीचळवळीने पुढे रेटून नेणे चुकीचे आहे हे विश्लेषण मला अतिशय पटले. आपले विचार ठोसपणे आणि परखडपणे मांडणे हे या लेखिकेचे वैशिष्ट्य मला फारच महत्त्वाचे वाटते. अभिनंदन!

**-छाया दातार**